।। सबका मालिक आत्मा ।।

# विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,कोकमठाण

(शिर्डी-कोपरगांव रोड),कोकमठाण, पो. जेऊर कुंभारी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र) ४२३६०१.
Email vishwatmak.purchase@gmail.com मो. ७५८८६९४०७७.

## खरेदी विभाग-निविदा

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२०**
**--------------------चा पुरवठा करण्याबाबत**
**निविदा**

**निविदा क्रमांक :-**

**निविदाधारकाचे पूर्ण नांव व पत्ता :-**..................................................

...................................................................................

**दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :-**.......................................................

.......................................................................................

# - निविदाधारकाची माहिती -

१. पुरवठादार फर्म/कंपनीचे नांव :------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :------------------------------------------------

३. दुरध्वनी क्रमांक :------------------------------------------------

४. ऑफिस :------------------------------------------------

५. दुकान :------------------------------------------------

६. निवास :------------------------------------------------

७. मोबाईल नंबर :------------------------------------------------

८. फॅक्स नंबर :------------------------------------------------

९. ई मेल :------------------------------------------------

१०.संपर्कासाठी अधिकृत व्यक्तीचे नांव :------------------------------------------------

११.दुरध्वनी क्रमांक :------------------------------------------------

१२.मालकाचे/भागीदाराचे नांव : १) ------------------------------------------------

२ )------------------------------------------------

३) ------------------------------------------------

४) ------------------------------------------------

१३.पॉवर ऑफ ॲटर्नी (असल्यास) चे नांवः------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------

१४.आयकर नोंदणी पॅन नंबर :------------------------------------------------

१५.जीएसटी क्रमांक :------------------------------------------------

......................................

निविदाधारकाची सही व शिक्का

पत्र क्रमांक – ९०२/२०१८
दिनांक – २५/१२/२०१८

प्रति,

........................................................

........................................................

**विषय :– शैक्षणिक वर्ष २०१९–२० शैक्षणिक साहित्य पुरविणेबाबत निविदा**

महोदय,

वरील विषयांचे संदर्भात दोन लिफाफे पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा भरतांना कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. निविदे सोबत सादर करावयाची कागद पत्रे, आर्थिक उलाढाली बाबतचे निकष व इतर शर्ती/अटींचा तपशिल सोबत दिला आहे.

२. पुरवठा करावयाच्या मालाचे नमुने ट्रस्टचे खरेदी विभागात पाहावयास मिळतील. त्या नमुन्याप्रमाणेच मालाचे दर नमुद करावेत. वेगळया मालाचे दर नमुद करू नयेत.

३. निविदेचे सुचनेत प्रसिध्द केलेला माल गरजे नुसार वेळेवर पुरविण्यास तयार असले बाबतची निविदा, मालाच्या नमुन्यासह बंद पाकिटात **दि. ०७/०१/२०१९ दुपारी ३.०० वाजे** पर्यंत कार्यालयीन वेळेत ट्रस्टचे कोकमठाण येथील कार्यालयाचे आवक विभागात सादर करावयाचे आहे.

४. निविदाधारकास पुरवावयाच्या मालाच्या एकुण किंमतीच्या १ टक्के किंवा रुपये २५,०००/– यापैकी जी रक्कम जादा असेल ती बयाणा रक्कम म्हणून निविदे सोबत भरावे लागेल.

५. बयाणा रक्कम **विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाणच्या लेखाशाखेत** अथवा बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा कोकमठाण खाते क्रमांक – ६०११३१८२६७७ मध्ये **विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट** यांचे नांवे आरटीजीएस व्दारे जमा करता येईल. स्थानिक सहकारी बॅंकेचे डि. डि. ग्राहय धरले जाणार नाही.

६. धनादेश स्विकारला जाणार नाही.

७. बयाणा रक्कमेची पावती किंवा डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस चलन स्वतंत्र पाकिटात कागद पत्रांसोबत जोडावी, पावतीची झेरॉक्स प्रत जोडू नये.

८. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकावर आहे.

९. कमी/जास्त दराची कुठलीही निविदा स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार ट्रस्ट व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे ट्रस्ट व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

१०. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

११. क्रमांक १ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्रमांक २ चे लिफाफ्यात बयाणा रक्कमेचा डि. डि. किंवा भरणा पावती व मागणी नुसार कागदपत्रे असावीत. प्रथम क्रमांक २ चा लिफाफा उघडून

त्यातील कागदपत्रे व बयाणा रक्कम मागणी प्रमाणे असल्यासच क्र. १ चा लिफाफा उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१२. निविदेमधील तांत्रिक निविदा फॉर्म तसेच आवश्यक व विहीत केलेले सर्व नमुने सही व शिक्क्यानिशी परिपुर्ण भरणे आवश्यक आहे.

१३. सदर निविदेत भाग घेणे, निविदेची कागदपत्रे सादर करणे, बैठकीकरीता उपस्थित राहणे करिता तसेच निविदेविषयक कामकाज पाहण्याकरिता प्रतिनिधिस प्राधिकृत केल्याचे पत्र. प्राधिकृत प्रतिनिधिशिवाय निविदा प्रक्रियेच्या विविध स्तरावर इतर कोणासही सहभाग घेता येणार नाही. सोबत नमुन क्र. २ जोडला आहे.

१४. निविदाकारास निविदेतील अटी व शर्ती मंजुर असल्याचे, काळया यादित समाविष्ट नसल्याचे व इतर बाबीसंदर्भात संलग्न (नमुना क्र.३) नुसार प्रातिज्ञापत्र रू. १०/—च्या न्यायालयीन मुद्रांकावर. (कोर्ट फी स्टॅम्प) सादर करणे आवश्यक आहे.(नमुना क्र.३ जोडला आहे)

१५. **टीप:—** निविदाकाराने वर नमुद केल्यानुसारच सर्व कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच सर्व कागदपत्रे व निविदा फॉर्मवरील प्रत्येक पृष्ठ शिक्क्यांसह स्व—साक्षांकीत करून सादर करण्यात यावेत. सदर कागदपत्राशिवाय कोणतेही पर्यायी कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत किंवा कोणतेही कागदपत्रे सादर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची संधी दिली जाणार नाही. तांत्रिक लिफाफ्यातील आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/अटी व शर्तीची पुर्तता न करणाऱ्या निविदाधारकांचे व्यापारी (दरांचा) लिफाफा उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

१६. **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट) :—** सर्व कागदपत्रे पुर्ण असल्याशिवाय दरपत्रकांचा लिफाफा उघडण्यात येणार नाही. चेक लिस्ट प्रमाणे कागदपत्रे तपासून पुर्ण असल्याबाबतचा अहवाल ट्रस्टचे लेखाविभाग व खरेदी विभागाकडून आल्याशिवाय व्यापारी दरांचा लिफाफा उघडण्यात येणार नाही.

१७. सोबत दर भरणेकामी व आवश्यक साहित्याचा तपशिल व वर्णनासह तक्ता पृष्ठ क्र................ नुसार जोडला आहे.

**प.पू. ओम गुरुदेवांचे कृपाशिर्वादासह !**

**आपले विश्वासू,**

**सचिव /उपाध्यक्ष/ अध्यक्ष**
खरेदी समिती
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,

**कोषाध्यक्ष/सरचिटणीस/अध्यक्ष**
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,
कोकमठाण

# विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण.

चैतन्यपूरी (शिर्डी-कोपरगांव रोड,)
तालुका. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र) ४२३६०१.

## निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करण्यात येणाऱ्या सर्व वस्तु नामांकीत कंपनीच्या किंवा ॲगमार्क /BIS/ISI मानांकन किंवा समकक्ष असाव्यात.

२. यापूर्वी ज्यांनी निविदेत भाग घेवून पुरवठा आदेश दिल्यानंतर मागणीनुसार मालाचा पुरवठा केलेला नाही अशा पुरवठादाराच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३. एकाच व्यक्तीस वेगवेगळया फर्ममधुन निविदेमध्ये भाग घेता येणार नाही. तसे आढळल्यास निविदा रद्द करणेत येईल.

४. नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्के पर्यंत जादा मालाची मागणी आश्रमाकडून झाल्यास जादा मालाचा पुरवठा मान्य दरानेच करण्यांचे निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

५. निविदेतील दर स्विकृत केल्याच्या दिनांकापासुन सन २०१९—२०२० या शैक्षणिक वर्ष पूर्ण होईपर्यंत वैध राहतील. ( १ जुन २०१९ ते ३१ मार्च २०२० हे शैक्षणिक वर्ष गृहित धरण्यात येईल.)

६. निविदेत मुळ दर नमुद करावा, वस्तु व सेवाकर (GST) टककेवारीत वेगळा नोंदवावा.

७. नमुद दर हे भारतीय रूपयामध्ये राहतील.

८. पुरवठादारास खरेदीच्या संख्या/परिमानावर हक्क सांगता येणार नाही. पुरवठा कालावधीत साहित्यांच्या किंमतीत वाढ झाल्यास वाढीव दराची मागणी पुरवठादारास करता येणार नाही. याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,कोकमठाण यांनी राखुन ठेवले आहेत.

९. **शालेय वही** — शालेय वहीची निविदा सादर करताना वहीची साईज, वहीचे पेजेस व पेपर तपासणीचे GSM ची LAB TEST CERTIFICATE सोबत जोडावे. आवश्यक पुरवठा करावयाचे वहीचे नमुना ट्रस्टचे खरेदी विभागात पाहावयास मिळतील.

१०. शालेय वहीचे कागदाचा दर्जा व्यवस्थापनाने TNPL Redient 58 GSM असा निश्चीत केलेला असून वेगळया प्रकारचे कागदाचे दर भरू नयेत. अशी निविदा स्विकारली जाणार नाही.

११. **शालेय पुस्तके** – शालेय पुस्तकात, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळ, नवनीत प्रकाशन, NCERT जीवनदिप, सरस्वती प्रकाशन, मॅकमीलन या पुस्तकाचा विक्रीदरावर डिस्कांऊट देय होईल असे दर नमूद करावेत.

१२. निविदेत भाग घेतलेल्या निविदाकारानेच प्रत्यक्ष काम करावयाचे असुन कोणत्याही परिस्थितीत उपपुरवठादार नेमता येणार नाही. निविदाधारक स्वत: उत्पादक नाही अशी बाब निदर्शनास आल्यास निविदा मंजूर केली जाणार नाही, किंवा मंजूर केलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल व अशा पुरवठादारास काळया यादीत टाकण्यात येईल व पुढे कधीही त्यास निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

१३. निविदा दर केवळ व्यापारी लिफाफ्यातील विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक असुन निविदेत अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास अशी निविदा अपात्र ठरू शकेल.

१४. निविदाकाराने सादर केलेली कागदपत्रे बनावट/चुकीची आढळल्यास अशा निविदाकराची निविदा विचारात घेतील जाणार नाही व त्याच्या विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा निविदाकारास भविष्यात विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट कोणत्याही निविदेत भाग घेता येणार नाही.

१५. निविदेतील सर्व कागदपत्रे सही शिक्यानिशी स्व–साक्षांकित (Self Attested) करणे आवश्यक आहे.

१६. निविदेमध्ये करावयाच्या साहित्याची नग संख्या अंदाजित आहे. त्यामध्ये कमी/जास्त होण्याची शक्यता आहे. जर साहित्य कमी किंवा जास्त आवश्यकता वाटल्यास निविदेतील दराप्रमाणे पुरवठा करण्यास पुरवठादारास बंधनकारक राहील.

१७. पुरवठादाराच्या अपुऱ्या पुरवठयामुळे व मालाची निकड लक्षात घेता किंवा पुरवठा वेळेत न केल्यास जादा दराने या कार्यालयास दुसरीकडून माल खरेदी करावा लागला तर या कार्यालयास झालेले नुकसान पुरवठादाराकडुन वसुल केले जाईल. या अनुषंगाने करार रद्द करणे किंवा कायदेशीर कारवाई करण्याचा विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांना राहतील. व याबाबत अध्यक्ष विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट यांचा निर्णय अंतिम राहील.

१८. पुरवठाधारकाकडून ज्या वस्तूंचा पुरवठा झाला, त्याबाबत शंका अथवा तक्रार प्राप्त झाल्यास तसेच, दर्जा खराब असल्याचे आढळल्यास व कायदेशीर कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१९. प्रयोगशाळा चाचणी आणि तपासणी (Lab Testing & Inspection) :— ज्या बाबींबाबत तपासणी करणे आवश्यक आहे. असे खरेदी समितीने ठरविल्यास अथवा ज्या बाबींबाबत शंका अथवा तक्रार उपस्थित झाल्यास, सदर नमुने शासनाने निश्चित केलेल्या विहीत मानकांप्रमाणे शासकीय प्रयोगशाळेकडुन तपासणी करण्यात येईल व सदर प्रयोगशाळा तपासणीसाठी येणारा खर्च निविदाधारकांकडुन वसुल करण्यात येईल.

२०. विहीत दर्जाच्या नमुन्याप्रमाणेच सर्व माल/वस्तुंचा पुरवठा करणेची पुरवठादाराची जबाबदारी आहे. पुरवठा केलेला माल/वस्तु विहीत दर्जाच्या आढळुन न आल्यास त्या तात्काळ पुरवठादाराने स्वखर्चाने बदलुन देणे बंधनकारक आहे. तसेच अशा मालाचा साठा पुरवठादारास करणेबाबत या विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

२१. कायदे आणि नियमन (Laws and Regulations) :— भारत, महाराष्ट्र शासन आणि विभागातील स्थानिक संस्थांचे कायदे आणि उपकायद्यानुसार व करारनाम्यांतर्गत कुठल्याही प्रकारचा वादविवाद उद्‌भवल्यास तो कोपरगांव सत्र न्यायालयाच्या कार्यकक्षेतच करता येईल.

२२. निविदेत नमुद केलेल्या सर्व बाबींसाठी दर नमुद करणे आवश्यक आहे. एखादया बाबीसाठी दर नमुद न केल्यास अथवा दिलेल्या बाबी व्यतिरिक्त बाबींचे दर नमुद केल्यास निविदा परिपुर्ण नसल्याचे मानुन सदर निविदा अपात्र करण्यात येईल.

२३. निविदा मंजूरीनंतर कोणत्याही वैधानिक शुल्क, कर, बोजा आणि इंधन इत्यादीच्या वाढीमुळे निर्माण होणारे कोणत्याही स्वरूपाचे दावे स्विकारले जाणार नाहीत.

२४. निविदेमध्ये नमुद सर्वच बाबी/सेवा/वस्तु घेतल्या जातीलच असे नाही, तर ज्यांची गरज असेल व जितकी गरज असेल त्याच घेतल्या जातील व त्यांचीच देयके अदा केले जाईल.

२५. देयकातुन नियमानुसार आयकर व अन्य करांची कपात करण्यात येईल.

२६. सदर निविदेस विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट व्यवस्थापन मंडळाची अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुरवठा आदेश देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

२७. निविदेतील मुळ दर भरतांना वरील सर्व बाबींचा विचार करून दर नमुद करण्यात यावेत. निविदेत नमुद केलेले दर हे हमाली, तोलाई, वाहतुक, जकात, टोल इ. सर्वसमावेशक

असुन विना अट असावेत, व सर्व दर हे कोकमठाण व त्या त्या शाखेतील भांडार पोहोचचे असावेत. तसेच निविदेतील दर अंकी व अक्षरी असे दोन्ही भरण्यांत यावेत.

२८. वस्तु पुरवठायाबाबत या कार्यालयाकडुन वेळोवेळी (आवश्यक त्या वेळेस) जे जे आदेश देण्यात येतील, त्यातील अटी/शर्तीचे पालन करणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२९. निविदाधारकास देयकांचे प्रदान झाल्यानंतर त्यांना दराबाबत काही शंका असल्यास त्यांनी एक महिन्याच्या आत खरेदी विभागाचे कार्यालयाशी संपर्क साधुन शंकेचे निरसन करून घ्यावे. त्यानंतर त्यांची कुठलीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

३०. माल पुरविणेचा खरेदी आदेश अथवा मागणी चलन दिलेपासून जास्तीत जास्त ६० दिवसाचे आत करण्यात यावा, विहीत मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. विलंबाबाबत (विलंबाच्या कालावधीत) प्रत्येक दिवशी रूपये ५००/— इतका दंड आकारण्यात येईल. मालाचा पुरवठा नमुन्याप्रमाणे न आलेस अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे नाकारला गेल्यास, अगर ठरवून दिलेल्या मुदतीत मालाचा पुरवठा निविदाधारकांकडून न झाल्यास ट्रस्टची अडचण होवून नये म्हणून, ट्रस्टला बाजारभावाने आवश्यक वाटेल तितका किंवा दिलेल्या आदेशाइतका माल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहिल. दुसरीकडून असा माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा लागलेल्या रक्कमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने आश्रमाला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रक्कमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बीलातून वसूल करण्यांचा अधिकार ट्रस्टला राहिल. अनामत रक्कमेची मर्यादा ठरविल्याप्रमाणे कायम ठेवावयाची आहे.

३१. बील सादर करतांना बीलांत, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचा संपूर्ण तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरुपात उल्लेख करु नये अन्यथा बील अदा केले जाणार नाही.

३२. ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजूर मालाच्या एकुण किंमतीच्या ५ टक्के इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून द्यावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेपासून १५ दिवसांचे आत सदर रक्कमेचा भरणा करावा लागेल. अन्यथा आपले मालाचे बीलातून सदरील रक्कम वसूल करणेत येईल. अनामत रक्कम माल पुरवठा करार वर्ष संपल्यानंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

३३. निविदेसोबत पुरवावयाच्या मालाच्या एकुण किंमतीच्या १ टक्के बयाणा रक्कम अथवा रुपये २५,०००/– यापैकी जी रक्कम जादा असेल त्या रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट अथवा रोख भरण्याची पावती, आरटीजीएस चलन, मार्केट यार्ड लायसेन्स, दुकान नोंदणी दाखला, अन्न व औषध प्रशासन परवाना (आवश्यकतेनुसार), जीएसटी/टिन नंबर, पॅन कार्ड इत्यादींचा साक्षांकित केलेल्या सत्यप्रती स्वतंत्र क्र.२ चे पाकिटात सादर कराव्यात. अन्यथा निविदा नाकारली जाईल.

३४. मालाचे मागणीनुसार प्रति नगाचे दर विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट भांडार पोहचचे सर्वसामावेशक दर द्यावेत.

३५. प्रत्येक मालाचे दर देतांना मुळ दर व जीएसटी वेगळा देण्यात यावा. दिलेल्या दराबाबत आवश्यकतेनुसार सविस्तर तपशिल स्वतंत्रपणे दयावा. तसेच जीएसटी टॅक्सचे आकारणीत काही बदल झाल्यास त्यानुसार दरामध्ये बदल करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

३६. मूळ निविदा स्वतंत्र माहोरबंद पाकिटात (साईज १४.५''X १२'') सादर करावी. पाकिटावर पाकिट क्रमांक १ "————————————————" **'पुरविणेची निविदा'** असा स्पष्ट उल्लेख करुन पाठविणाऱ्यांचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक नमुद करावा. तसेच पाकिट क्र २ ( १४'' X १०'') मध्ये बयाणा रक्कमेची पावती/डि. डि. व इतर सर्व कागदपत्रे सादर करावीत. दोन्ही पाकिटे परस्परांना संलग्न करुन **दिनांक ०७/०१/२०१९ दुपारी ३.०० वाजे.** पर्यंत विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे आवक विभागात सादर करावीत. प्रथम पाकिट क्र. २ उघडून त्यातील कागदपत्रे मागणीनुसार बरोबर असल्यासच पाकिट क्र. १ (निविदा पाकिट) उघडले जाईल, अन्यथा निविदा पाकिट उघडले जाणार नाही. पूर्वीच्या निविदेसोबत दिलेली कागदपत्रे व बयाणा रक्कम विचारात घेतली जाणार नाहीत.

३७. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क ट्रस्टने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे ट्रस्टवर बंधनकारक असणार नाही.

३८. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेपासून १५ दिवसांत समक्ष येवून रु. १००/– चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करुन दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास, निविदाधारकाने सादर केलेली निविदा करारनामा म्हणून गणण्यांत येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही.

३९. मंजूर झालेल्या मान्य दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार

नाही. निविदाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास पुर्णतः सुरक्षा अनामत रक्कम ट्रस्ट खाती जमा करणेत येईल.

४०. प्राप्त मालाचे देयक माल प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत करण्यात येईल. मात्र बिलापोटी कोणत्याही प्रकारची अग्रिम रक्कम अदा केला जाणार नाही.

४१. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणेचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्यांचा अधिकार ट्रस्ट व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकांची कोणतीही अट/अटी ट्रस्टवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

४२. शालेय गणवेशाची निविदा एका विभागासाठी (शाळेसाठी) सादर करता येईल.

४३. शालेय गणवेश, स्पोर्ट व नाईट गणवेश, शुज व सॉक्स, टॉवेल, बेडशिट, मच्छरदाणी, रूमाल, तेल, पेस्ट, साबन या साहित्याचे वर्णन सोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केले आहे. त्याप्रमाणेच दर भरावेत. अन्य दुसऱ्या प्रकारचे दर भरू नयेत.

**सचिव /उपाध्यक्ष/ अध्यक्ष**
खरेदी समिती
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,

**कोषाध्यक्ष/सरचिटणीस/अध्यक्ष**
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,
कोकमठाण.

**अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ (उदा.ग्रामपंचायत/नगरपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका) अगर तत्सम शासकीय परवाना/शासकीय उत्पादक परवाना

२. GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती

३. पॅन कार्ड

४. बयाणा रक्कम UTR Number/ बँक भरणा पावती

५. निविदा किंमत UTR Number/ बँक भरणा पावती

६. आर्थिक वर्ष **२०१७-२०१८** चे ताळेबंद पत्रक

७. निविदाकाराने ज्या नावाने निविदा भरलेली आहे फक्त त्यांचेच मागील तीन वर्षाचे (सन असणे २०१५–२०१६, २०१६–२०१७, २०१७–१८) सरासरी उलाढाल किमान रूपये (रू.२,००,००,०००/–) असणे आवश्यक आहे. मान्यताप्राप्त सनदी लेखापाल यांचे उलाढाल दर्शविणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. निविदाकरांनी उपरोक्त नमुद तीनही वर्षाचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र, ताळेबंद (Audited Statement) सादर करणे बंधनकारक आहे.

८. निविदाकार हा जर वितरक/व्यापारी असेल तर ज्या उत्पादकाच्या वस्तु करीता त्याने निविदा भरली आहे अशा उत्पादकाचे प्राधिकार पत्र (Authorisation) जोडावे. सोबत नमुना क्र. १ जोडला आहे.

९. सोबत जोडलेले नमुने भरणे आवश्यक आहे. लागू नसेल तर लागू नाही असा उल्लेख करावा.

**दिनांक : / /२०**

**ठिकाण :** **निविदाधारकाची सही व शिक्का**

**नमुना क्र.०१**

दिनांकः / /२०

प्रति,

**मा.अध्यक्ष,**
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट
कोकमठाण, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

विषयः-------------------------------------------------

आदरणीय महोदय,

आम्ही---------------------------------------------एक नावाजलेले उत्पादक/ पुरवठादार असुन---------------------------------------------वस्तुचे उत्पादन/पुरवठा आमच्या -------------------------------------------------------या ठिकाणी करीत आहोत. या संदर्भात आम्ही-------------------------------------------यांना आमच्या कंपन्याचे उत्पादित वस्तूच्या वितरणासाठी अधिकृत वितरक म्हणुन नेमणुक केली आहे.

आपला विश्वासु

(उत्पादकाचे स्वाक्षरी नाव व पत्ता व शिक्का)

टिपः- वरील प्राधिकार पत्र हे उत्पादकांच्या पत्रावर (लेटर हेड) देणे आवश्यक आहे. आणि प्राधिकार पत्र देणारे हे उत्पादकांचे सक्षम अधिकारी असावेत.

**नमुना क्र.०२**

दिनांकः / /२०

प्रति,

**मा.अध्यक्ष,**
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट
कोकमठाण, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

विषयः--------------------------------------------------

आदरणीय महोदय,

आम्ही---------------------------------------------एक नावाजलेले उत्पादक/ पुरवठादार असुन------------------------------------------वस्तुचे उत्पादन/पुरवठा आमच्या -----------------------------------------------------या ठिकाणी करीत आहोत. या संदर्भात आम्ही-----------------------------------------यांना आमच्या कंपन्याचे उत्पादित/पुरवठा वस्तूसाठी निविदा प्रक्रियेत भाग घेणे, दर ठरविणे, कान्ट्रॅक्टप्रमाणे अंतिमतः पुरवठा पुर्ण करणे यासाठी सर्वस्वी अधिकार या विशेष निविदा नंबर -------------------------साठी देत आहोत.

आपला विश्वासु

(निविदाकाराची स्वाक्षरी नाव व पत्ता व शिक्का)

**प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी**

# नमुना क्र.०३

दिनांकः / /२०

प्रति,

**मा.अध्यक्ष,**
विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट
कोकमठाण, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

मी प्रतिज्ञेवर सादर करतो की,---------------------------------पुरविणेबाबतच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला पुर्णतः मान्य आहेत.

१. निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणतेही फेर फार केलेली नाही. निविदेत नमुद केलेले दर हे सर्वकर, हमाली, तोलाई, वाहतुक, जकात, टोल इ. सर्वसमावेशक असुन, विना अट आहेत.

२. तसेच मला अथवा माझ्या संस्थेस कोणत्याही शासकीय, निम शासकीय, शासन अंगीकृत उपक्रमाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रगतीत/प्रस्तावित नाही.

३. बालमजुरी, कामगार कायदे, लैंगिक पिळवणुक, मानवाधिकार इ. विषयी आवश्यक धोरणाचेही आमच्याकडून पालन होते.

वरील नमुद सर्व माहिती मान्य असुन यात चुक आढळल्यास मी कारवाईस पात्र असेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

**टिपः-**

- वरील माहिती रू.१०/-च्या स्टॅम्प (कोर्ट फी स्टॅम्प) पेपर वर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

**निविदाकाराची स्वाक्षरी नाव व पत्ता व शिक्का**